# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२६ / आषाढ १९, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(४)** | **अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

---

### अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची प्रलंबित उच्च शिक्षण शिष्यवृत्ती तातडीने मंजूर करणेबाबत

**(१) * ४१२०९ श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मधील काही अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची व सन २०२५-२६ मधील उच्च शिक्षणाची जवळपास १२५ कोटी रुपयांची शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्ती न मिळाल्यामुळे गरीब व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयांची फी भरणे आणि शैक्षणिक खर्च भागवणे कठीण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिष्यवृत्तीच्या वितरणासाठीचा संबंधित विभागाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मंजुरीसाठी नेमका कधी सादर करण्यात आला होता आणि त्यावर वित्त विभागाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शासनातर्फे १२५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देऊन शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणासाठी सुरु असलेल्या योजनेसाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्तीसाठी रु.३०.२८ कोटी इतका निधी वितरीत करावयाचे प्रलंबित होते. दिनांक २५.०६.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ वर्षातील सर्व प्रलंबित देय असलेला निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील शिष्यवृत्तीसाठी ₹११६.१६ कोटी निधी वितरित करण्याचे शिल्लक होते. दिनांक २५.०६.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१८ कोटी निधी वितरीत केल्याने सन २०२५-२६ वर्षातील रु.९८.१५ कोटी एवढा निधी वितरीत करणे शिल्लक आहे.

(२) शिष्यवृत्ती न मिळाल्याने कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) सन २०२४-२५ व सन २०२५-२६ वर्षामध्ये शिष्यवृत्ती योजनेसाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी पुरवणी मागणी प्रस्ताव माहे जुलै, २०२५, माहे डिसेंबर, २०२५ व माहे फेब्रुवारी, २०२६ अधिवेशनामध्ये वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर केला होता. परंतु सदर प्रस्ताव अमान्य झाला आहे.
(४) व (५) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी सन २०२५-२६ वर्षातील देय रकमेपैकी रु.९८.१५ कोटी रक्कम वितरीत करण्याचे बाकी आहे. सदर निधी सन २०२६-२७ वर्षामध्ये उपलब्ध होणाऱ्या निधीमधून वितरीत करण्यात येत आहे.

-----------------

## थेऊर-लोणीकंद (ता.हवेली, जि.पुणे) येथील अष्टविनायक महामार्ग रस्ता रुंदीकरण प्रकल्पासाठी प्रतिपुरक वृक्षारोपणाच्या नियमांचे झालेले उल्लंघन

**(२) * ३७५४४ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) थेऊर-लोणीकंद (ता.हवेली, जि.पुणे) येथील अष्टविनायक महामार्ग रस्ता रुंदीकरण प्रकल्पासाठी पर्यावरणीय अटींनुसार ४००० वृक्षांचे प्रतिपुरक वृक्षारोपण करणे बंधनकारक होते हे वृक्षारोपण न करताच संबंधित कंपनीस काम पूर्ण झाल्याचे खोटे प्रमाणपत्र देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रति वृक्ष रु. २००० प्रमाणे ४००० वृक्षासाठी रु. ८०,००,००० खर्च अपेक्षित असताना या निधीचा अपहार झाल्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून ४००० वृक्षांची GIS, जिओ-टॅगिंग करण्याबाबत तसेच श्री. एम. जे. सनस, तत्कालीन वन अधिकारी, ता. हवेली यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करून, पि.सि.एल.एम. अष्टविनायक थेडर प्रा. लि. या कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करून अपहार केलेल्या निधीची वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

पुणे विभागातील पी एन ३३- अष्टविनायक मार्गाची सुधारणा करणे, भाग ३ कर्डे ते रांजणगाव किमी ०/०० ते ९/६९६, कर्डे ते न्हावरा किमी ४/८०० ते १६/९२५ व लोणीकंद ते थेऊरफाटा किमी ३९/०० ते ५६/३६८ या रस्ता प्रकल्पासाठी सवलत करारनाम्यातील अटींनुसार २२५८ वृक्षांचे वृक्षारोपण करणे बंधनकारक होते. तथापि, कामाच्या वावाच्या बदलानुसार (तांदळी ते इनामगाव ही लांबी कमी झाल्यामुळे) १९३९ इतकी झाडे लावणे बंधनकारक होते. त्यानुसार जवळपास २००० इतकी झाडे लावण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.

प्रकल्पाचे सवलतकार / कंत्राटदार यांच्यामार्फत त्याच्याच खर्चाने वृक्षारोपण करणे अपेक्षित असल्याने निधीचा अपहार झालेला नाही.
(३) व (४) निविदा करारातील अटी-शर्तीप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

-----------------

## तीर्थपुरी (ता.घनसावंगी, जि.जालना) येथील तुपाच्या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने टाकलेला छापा

**(३) * ४१०२३ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तीर्थपुरी (ता. घनसावंगी, जि.जालना) येथील मे. मुंदडा इंडस्ट्रीज या तुपाच्या कारखान्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकाने दिनांक ०४ जून, २०२६ रोजी वा त्या सुमारास छापा टाकला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शुद्ध तुपाच्या नावाखाली मानवी आरोग्याला अत्यंत घातक ठरेल अशा पध्दतीने खाद्यतेल सुवासिक इसेन्स (केमिकल) मिसळल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने संबंधित कारखानदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१), (२) व (३) दिनांक ०३/०६/२०२६ रोजी अन्न व औषध प्रशासन कार्यालयाच्या पथकाने तीर्थपुरी, ता. घनसावंगी, जि. जालना येथे मे. मुंदडा इंडस्ट्रीज या आस्थापनेवर छापा टाकला असता, सदर ठिकाणी तुपामध्ये खाद्य तेल व तुपाच्या फ्लेवरचा ईसेन्स मिश्रीत करुन बनावट तुप तयार करत असल्याचे निदर्शनास आले होते. अन्न सुरक्षा अधिकारी यांनी सदर आस्थापनेची तपासणी करुन अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम २६ (२), २७ व ३८ (१) (a) (i) नुसार सदर आस्थापनेमधून एकूण ८ अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेतले. सदर ठिकाणी तपासणीवेळी विना लेबल बाटलीमध्ये ईसेन्स (घी फ्लेवर) आढळून आल्याने नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला आहे. सदर छाप्यामध्ये पॅकबंद स्वरुपातील १,१२१.८ लिटर तुप, खुला स्वरुपातील ६६३.८ लिटर तुप व ११८ लिटर रिफाईड सोयाबीन तेल असा एकूण १३,०४,५३९/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

सदर आस्थापनामधून विश्लेषणासाठी घेण्यात आलेले नमुने अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आले आहे. सदर नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे. विश्लेषण अहवाल प्राप्त होताच अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ व नियम व नियमने, २०११ नुसार कारवाई करण्यात येईल.

तसेच तपासणीतील त्रुटीच्या अनुषंगाने सदर आस्थापनेचा अन्न परवाना क्र. ११५१८०४५०००२७०, विधी ग्राहयता ०९/१०/२०२६ अन्न सुरक्षा व मानके (अन्न व्यावसायिकांचे परवाना व नोंदणी) नियमन, २०११ चे नियमन २.१.८ (४) नुसार तात्काळ प्रभावाने निलंबित करुन आस्थापना सिल केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील मौजा वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजना वसाहतीत मूलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४) * ३३८०५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर वाठोडा परिसरातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या वसाहतीत सुमारे २३०० कुटुंबांचे वास्तव्य असूनही तेथे रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, आरोग्य केंद्र व मूलभूत सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसाहतीत मोबाईल नेटवर्कचा अभाव, नाल्यांची दुरवस्था व सांडपाणी व्यवस्थेतील त्रुटी यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसाहत परिसरात अवैध कृत्यांचे प्रमाण वाढले असून अंमली पदार्थ विक्री व असामाजिक घटकांचा वावर वाढल्यामुळे महिलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित वसाहतीचे बांधकाम करताना कंत्राटदार व संबंधित यंत्रणांकडून निकृष्ट दर्जाचे काम झाल्यामुळे इमारतींमध्ये सिपेज, भेगा निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीत झालेल्या त्रुटी व भ्रष्टाचाराच्या आरोपांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर वसाहतीतील नागरिकांना मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यासह दोषी अधिकारी/कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) नागपूर महानगर प्रदेश प्राधिकरणाव्दारे मौजा वाठोडा येथे २६४, मौजा तरोडी (खुर्द) येथे ३३१६ अशा एकूण ३५८० घरकुलांची कामे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत दि.१३.११.२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात आली आहेत.

सदर योजनेमध्ये मंजुर विकास आराखड्यानुसार सर्व पायाभूत सुविधा देण्यात आल्या आहेत व मौजा वाठोडा तसेच तरोडी येथील मंजूर प्रकल्पांतर्गत गाळे धारकांची नोंदणीकृत सोसायटी असून सदर सोसायटीमार्फत मूलभूत सुविधा व देखभाल केली जाते.

(३) वाठोडा परिसरात प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत उभारण्यात आलेल्या वसाहतीमध्ये सन २०२५ मध्ये जुगाराच्या १ गुन्ह्याची वाठोडा, नागपूर शहर पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे व संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. तसेच सन २०२६ मध्ये तिथे अवैध गुन्ह्याची नोंद झालेली नाही.

(४) सदर योजनेचे काम मानकाप्रमाणे व निविदा मधील सर्व अटी शर्ती प्रमाणे करण्यात आले असून त्यांचे त्रयस्थ पक्ष तांत्रिक निरीक्षण VNIT, Nagpur यांच्यातर्फे करण्यात आले आहे. सदर संस्थेच्या तांत्रिक निरीक्षण अहवालानुसार सर्व कामे गुणवत्तेनुसार व नियमाप्रमाणे झाल्याचे प्रमाणित करण्यात आले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील १२५ सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्णपणे बंद असल्याबाबत**

**(५) * ४१२७४ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील १२५ सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (एसटीपी) पूर्णपणे बंद असून प्रक्रिया न केलेले सांडपाणी, नदी, नाले, भूजलात मिसळत असल्यामुळे शहरात प्रदूषण निर्माण होऊन दुर्गंधी पसरल्याने नदीकाठच्या पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलजन्य व इतर रोगांपासून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडे नागरिकांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (एसटीपी) सुरु करण्याचे आश्वासन देऊनही अद्याप बंद ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू बंद असलेले १२५ सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (एसटीपी) तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागात याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) व (४) महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मैलाशुद्धीकरण केंद्रे कार्यान्वित ठेवणे ही संबंधित सोसायटीची जबाबदारी असून खाजगी मैलाशुद्धीकरण केंद्रे कायमस्वरुपी कार्यान्वित राहण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सल्लागार एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. मैलाशुद्धीकरण केंद्रे कार्यान्वित राहण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सोसायट्यांस तांत्रिक सहाय्य करण्यात येत आहे. मैलाशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित नसल्याचे आढळून आल्यास अशा सोसायट्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय नोटीसा बजावण्यात येत असून UDCPR नियमावलीनुसार नळ कनेक्शन खंडित करण्याची कार्यवाही देखील करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर गॅस टँकरच्या धडकेत पती-पत्नीचा मृत्यू झाल्याबाबत

**(६) * ३५४६३ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील खेड शिवापूर टोल नाक्याजवळ गॅस टँकरच्या धडकेत दुचाकीवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची भीषण दुर्घटना घडल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेत मृत्यू झालेल्या दाम्पत्याच्या कुटुंबियांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती अत्यंत बिकट असून संबंधित कुटुंबाला शासनामार्फत आर्थिक मदत देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपघातास कारणीभूत ठरलेल्या गॅस टँकर चालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करुन संबंधित वाहनाची तपासणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खेड शिवापूर टोल नाका परिसर हा अपघातप्रवण क्षेत्र बनला असून यापूर्वी देखील अनेक भीषण अपघात घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, वाहतूक पोलीस विभाग व संबंधित प्रशासनामार्फत सदर परिसरात वाहतूक नियंत्रण, वेगमर्यादा अंमलबजावणी, सीसीटीव्ही यंत्रणा, इशारा फलक व सुरक्षा याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने खेड शिवापूर टोल नाका परिसरातील वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी स्वतंत्र सुरक्षा ऑडिट, अवजड वाहनांसाठी स्वतंत्र लेन, वेग नियंत्रण प्रणाली व आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे आहे.

पुणे - बंगळुरू हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ असा वर्गीकृत असून या महामार्गावरील पुणे ते सातारा ही लांबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीत येते.

दि. ०८ मे, २०२६ रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील खेड-शिवापूर टोल नाक्याजवळ गॅस टँकरने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला. पोलीस विभागाच्या अहवालानुसार टँकर चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणे भरधाव वेगाने टँकर चालविल्याने अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अपघातातील मृत व्यक्तींच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही प्रचलित कायद्यांनुसार मोटार अपघात दावा न्यायाधिकरण (MACT), संबंधित विमा कंपनी व इतर सक्षम प्राधिकरणामार्फत केली जाते. प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(३) पोलीस विभागाच्या अहवालानुसार सदर अपघातप्रकरणी राजगड पोलीस ठाण्यात पुणे (ग्रामीण) संबंधित चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता व मोटार वाहन कायद्यातील लागू तरतुदीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस विभागामार्फत तपास सुरू आहे. तसेच तपासादरम्यान उप प्रादेशिक परिवहन विभाग, पुणे यांचेकडून वाहन तपासणी करण्यात आली आहे.

(४) व (५) खेड शिवापूर टोल नाका परिसर व लगतच्या महामार्ग लांबीमध्ये कोणतीही अभियांत्रिकी कमतरता नसून झालेले अपघात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे व अतिवेगामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

खेड- शिवापूर टोल नाका परिसरात वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने स्पीड लिमिट बोर्ड, रंबल स्ट्रीप, रेट्रो रिफ्लेक्टिव्ह फलक, क्रॅश बॅरियर्स, रोड मार्किंग, प्रकाशयोजना, सीसीटीव्ही, रुग्णवाहिका, क्रेन व आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था उपलब्ध आहे. तसेच महामार्ग पोलिसांच्या समन्वयाने वाहतूक नियंत्रणाची कार्यवाही नियमितपणे केली जाते.

तसेच राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत वेळोवेळी सुरक्षा पाहणी करण्यात येते.

(६) पुणे-सातारा महामार्गाच्या भागाचे 3rd Party Safety Consultant कडून Quarterly Safety Audit केले जाते. Safety Consultant यांनी सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पोलीस विभाग व स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयाने केली जाते.

-----------------

## मुंबईतील मिठी नदीतील गाळ उपसा कामात झालेली अनियमितता

**(७) * ३५६४४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदीतील गाळ उपसा कामांबाबत अनियमितता झाल्याच्या तक्रारी माहे मे, २०२६ मध्ये शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारींची दखल घेऊन महानगरपालिका व संबंधित विभागामार्फत गाळ उपसा कामांची तांत्रिक तपासणी, निविदा प्रक्रिया व कामाच्या गुणवत्तेची पडताळणी सुरू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात पावसाळ्यात होणारी पूरस्थिती टाळण्यासाठी मिठी नदीतील गाळ उपसा, जलप्रवाह क्षमता वाढविणे व नदी स्वच्छता मोहिमेची कामे युद्धपातळीवर करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भविष्यात अशा प्रकारच्या तक्रारी टाळण्यासाठी ई-टेंडरिंग, जीपीएस आधारित देखरेख, तृतीय पक्ष लेखापरीक्षण व पारदर्शक कार्यपद्धती लागू करण्याबाबत शासनाने विशेष योजना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने मुंबईकरांना पूरस्थितीपासून दिलासा मिळावा व मिठी नदी सुधार प्रकल्प अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मिठी नदीतील गाळ उपसा कामासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे लोकप्रतिनिधी यांचेकडून दिनांक १४ मे, २०२६ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) हे खरे नाही.

संबंधित लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ मे, २०२६ रोजी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन महानगरपालिकेने दिनांक ३ जुलै, २०२६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना वस्तुस्थिती कळविली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मिठी नदीतील गाळ उपसा कामांसाठी प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन सन २०२६ करीता निविदा ई-महाटेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करुन निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

सध्या कामाच्या अंमलबजावणी दरम्यान पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक वाहनाचे Geo Tag Photos व Video नोंदविले जातात. तसेच, कृत्रिम बुध्दीमत्ता (AI) या द्वारे त्यांची तपासणी केली जाते. या दरम्यान आढळणाऱ्या त्रुटी / विसंगतीबाबत नियमानुसार कारवाई करण्यात येते.

तसेच गाळ वाहून नेणाऱ्या प्रत्येक गाडीचे VTS (Vehicle Tracking System) द्वारे निरिक्षण करण्यात येते. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन AI VTS, Software App द्वारे Real Time Monitoring इत्यादी सर्व माहिती नागरिकांकरीता उपलब्ध आहे.

(५) मिठी नदीच्या पूर नियंत्रणाकरीता नेमण्यात आलेली चितळे समिती, केंद्रीय जल अनुसंधान संस्था तसेच आय.आय.टी., मुंबई यांनी केलेल्या शिफारशी विचारात घेऊन मिठी नदीच्या रुंदीकरणाची, खोलीकरणाची ९७% कामे पूर्ण करण्यात आली. तसेच संरक्षक भिंत बांधण्याचे काम ९१%, मलनि:स्सारणाचे काम ६५% व सेवा रस्त्याचे काम ३०% पूर्ण करण्यात आले आहे.

मिठी नदी सुधार प्रकल्पाने बाधित होणारी अतिक्रमणे निष्कासनाची व अतिक्रमण धारकांच्या पुनर्वसनाची कार्यवाही सुरु आहे.

याव्यतिरिक्त सन २०२६ च्या चालू वर्षासाठी मिठी नदीतील गाळ काढण्याचे काम करण्याकरीता कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच उद्दिष्टानुसार पावसाळ्यापूर्वी मिठी नदीतील गाळ काढण्याचे ८०% काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित २०% काम पावसाळ्या दरम्यान वा पावसाळ्यानंतर करण्यात येते.

----------------

**अहेरी (जि.गडचिरोली) नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्याने बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सेवेत प्रवेश केल्याबाबत**

**(८) * ३२८०२ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहेरी (जि. गडचिरोली) नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्री.गणेश शहाणे यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे अपंग (दिव्यांग) प्रमाणपत्र मिळवून शासकीय सेवेत प्रवेश केल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथील शासकीय रुग्णालयाने अपात्र ठरविल्यानंतरही श्री.गणेश शहाणे यांनी धुळे येथून संशयास्पद पद्धतीने प्रमाणपत्र मिळवले तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग व जिल्हाधिकाऱ्यांनीही या प्रकरणावर आक्षेप नोंदवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी विशेष समिती नेमणे, संबंधित अधिकाऱ्याने सादर केलेल्या अपंग प्रमाणपत्राची राज्यस्तरीय पडताळणी करणे तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सेवेत नियुक्ती मिळवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भविष्यात अशा प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी अपंग प्रमाणपत्रांसाठी एकसंध डिजिटल पडताळणी प्रणाली सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

श्री.शहाणे, मुख्याधिकारी हे एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कार्यरत असल्याने दिव्यांग वैद्यकीय मंडळ, सर्वोपचार रूग्णालय, धुळे यांनी श्री.गणेश शहाणे, मुख्याधिकारी यांची दिव्यांग मंडळ तपासणी रजिस्टरमध्ये नोंद दिसून येत नसल्याने त्यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र अवैध असल्याचा अहवाल दि.१८.०६.२०२६ रोजी सामान्य प्रशासन विभागास सादर केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) श्री.शहाणे यांच्या दिव्यांगत्वाची वैद्यकीय मंडळ, वैद्यकीय रूग्णालय, नागपूर यांनी दि.०७.०७.२०२३ व सर जे.जे.रूग्णालय, मुंबई यांनी दि.२८.०४.२०२५ अन्वये दिलेल्या तपासणी प्रमाणपत्रामध्ये त्यांचे दिव्यांगत्व ४२% असल्याचे दिसून आले आहे.

तथापी, दिव्यांग वैद्यकीय मंडळ, सर्वोपचार रुग्णालय धुळे यांनी श्री.शहाणे यांच्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्रासंदर्भात सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दि.०१.०७.२०२६ अन्वये श्री.शहाणे यांना नोटीस देऊन त्यांची नियुक्ती रद्द का करण्यात येऊ नये, याबाबत खुलासा मागविलेला आहे.

(४) दिव्यांग कल्याण विभागामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्राच्या एकसंघ डिजिटल पडताळणीच्या अनुषंगाने धोरण निश्चित करता येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मुंबईतील दुकाने व आस्थापनांवर मराठी भाषेत नामफलक लावण्याबाबत

**(९) * ३६२८७ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या हद्दीतील दुकाने आणि आस्थापनांवर मराठी भाषेत नामफलक लावण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या ३,११४ आस्थापनांकडून १ कोटी ९१ लाख रुपयांहून अधिक दंड वसूल केल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही मुंबईतील ५,०२० हून अधिक आस्थापनांनी मराठी पाट्या लावण्याकडे दुर्लक्ष केले असून नियमांचे उल्लंघन होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने प्रत्येक वॉर्डातील केवळ दोन विशेष अधिकाऱ्यांसह एकूण ४८ अधिकाऱ्यांवर मोठ्या संख्येने असलेल्या आस्थापनांच्या तपासणीचा ताण येत असल्यामुळे प्रत्यक्ष कार्यवाहीत अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने राज्यातील दुकानांवर मराठी पाट्या लावण्याच्या नियमाची पूर्णत: अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) सुधारीत अधिनियम, २०२२ अंतर्गत कलम ३६ क (१) व नियम ३५ च्या तरतुदीनुसार मराठी भाषेत म्हणजेच देवनागरी लिपीत नामफलक प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (एस) (सिव्हील) क्र.७७५/२०२२ मध्ये दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशान्वये महाराष्ट्रातील सर्व दुकाने व आस्थापनांनी मराठी म्हणजेच देवनागरी लिपीतील नामफलक लावण्याच्या कायदेशीर तरतुदीचे पालन करावे, असे स्पष्ट केले. तसेच मराठी नामफलक लावण्यासाठी आस्थापनांना दोन महिन्याची मुदत दिली.

मा.सर्वोच्य न्यायालयाच्या निकालानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ०४ जून, २०२६ या कालावधीत १० लाखांपेक्षा जास्त आस्थापनांपैकी मुख्य/महत्वाचे रस्त्यावरील दर्शनीय भागात स्थित असलेल्या २,००,०६७ आस्थापनांना भेटी दिल्या. त्यापैकी १,९३,७४७ आस्थापनांनी मराठी नामफलक प्रदर्शित केल्याचे आढळून आले असून ६,३२० आस्थापनांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यापैकी ३,८६१ एवढ्या आस्थापनांवर न्यायालयीन खटले दाखल केले असून त्यापोटी रु.१.९५ कोटी इतका दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच १००३ आस्थापनांनी रु.१.०२ कोटी इतके अपराध प्रशमन शुल्क (Compounding Fees) भरुन सामोपचाराने आपसात मिटविला आहे. उर्वरीत १४५६ आस्थापनांविरुद्धचे खटले न्यायप्रविष्ठ आहेत.

(३) मुंबई महानगरपालिकेच्या २६ वॉर्डमधील आस्थापनांची तपासणी ही दुकाने व आस्थापना खात्याच्या वरिष्ठ सुविधाकार आणि सुविधाकार या अधिकाऱ्यांकडून करण्यात येते. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये वरिष्ठ सुविधाकार आणि सुविधाकार यांची एकुण १२७ पदे मंजूर असून ५३ पदांवर अधिकारी कार्यरत आहेत. उर्वरीत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर पदे भरण्याकरीता संस्थेची निवड करण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर अंतिम टप्प्यात आहे.

(४) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) सुधारीत अधिनियम, २०२२ अंतर्गत कलम ३६ क (१) व नियम ३५ च्या तरतुदीनुसार दिनांक १४ मे, २०२६ ते दिनांक ०४ जून, २०२६ या कालावधीमध्ये नामफलकाची कार्यवाही करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आली. तसेच आस्थापनेचे नामफलक मराठी भाषेत प्रदर्शित करण्याबाबत जनजागृतीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक महापालिकेच्या पूर्व विभागातील गांधीनगर येथील उप कार्यालयात झालेला गैरव्यवहार

**(१०) * ३९०८१ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महापालिकेच्या पूर्व विभागातील गांधीनगर उप कार्यालयांतर्गत असलेल्या नागरी सुविधा केंद्रात मालमत्ता कर आणि पाणीपट्टी वसुलीत तब्बल २४ लाख २५ हजार ९४० रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गांधीनगर येथील नागरी सुविधा केंद्रात नागरिक आपला मालमत्ता कर आणि पाणीपट्टी रोखीने जमा करत असून दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ या अल्प कालावधीत जमा झालेली लाखो रुपयांची रक्कम पालिकेच्या तिजोरीत जमा न करता तिचा गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार केवळ एका ठराविक काळापुरता मर्यादित नसून याचे धागेदोरे जुन्या प्रकरणांशी असण्याची शक्यता असल्याने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी शासनाने केली आहे काय.

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे,

परंतु, सदर घटना माहे एप्रिल, २०२६ मध्ये नव्हे, तर माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे,

नाशिक महानगरपालिकेच्या गांधीनगर उपकार्यालयातील नागरी सुविधा केंद्रात मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीमध्ये रु. २४,४४,२०७/- इतक्या रकमेचा गैरव्यवहार लेखापरीक्षण अहवालानुसार निदर्शनास आले होते. दिनांक ३०/११/२०२१ ते दिनांक १०/०२/२०२२ या कालावधीत झाला असल्याचे महानगरपालिका लेखापरीक्षणानुसार सिद्ध झाले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेश दिनांक ०२/०३/२०२३ अन्वये संबंधितांवर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती.

दिनांक २६/०८/२०२३ रोजीच्या विभागीय चौकशी अहवालामध्ये सदर प्रकरणातील दोषी कनिष्ठ लिपिक यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप क्रमांक १ व २ पूर्णतः सिद्ध झाले आहेत. दोषी कर्मचारी यांच्याकडून अपहार केलेली संपूर्ण रक्कम म्हणजेच रु. २४,४४,२०७/- (अक्षरी रुपये चोवीस लक्ष चव्वेचाळीस हजार दोनशे सात फक्त) महानगरपालिका कोषागारात पूर्णतः वसूल करण्यात आली असून कामकाजात उत्तरदायित्व, पारदर्शकता, सचोटी व कर्तव्यपरायणता ठेवली नसल्याचे चौकशीत सिद्ध झाल्यामुळे, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या दिनांक ०८/१२/२०२३ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (२) (क) मधील तरतुदींनुसार त्यांच्या आजपर्यंत मंजूर करण्यात आलेल्या सर्व वेतनवाढी कायमस्वरूपी रद्द करण्यात आल्या असून सदर आदेशाच्या दिनांकापासून त्यांची सेवाज्येष्ठता धरण्याची जबर शास्ती लागू करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरी सुरक्षेसंदर्भात करावयाच्या उपाययोजना

**(११) * ३५९७४ श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात सध्या १८२ इमारती धोकादायक घोषित करण्यात आल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची संख्या ४२८ वरून ४९६ वर गेल्याचे निदर्शनास आले असून यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे,
(३) असल्यास, नालेसफाई कामांमध्ये मुंबई महापालिका आणि रेल्वे प्रशासनामधील समन्वयाच्या अभावामुळे पुरस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे तसेच संयुक्त कृती आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पावसाळ्यात साथीचे आजार, पूरस्थिती व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आरोग्य व आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत कोणती विशेष पूर्वतयारी करण्यात आली आहे,
(५) असल्यास, मुंबईत दरड कोसळण्याच्या २४९ ठिकाणांपैकी ४६ अतिधोकादायक ठिकाणांबाबत कोणते सावधगिरीचे उपाय केले आहेत किंवा कोणत्या प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने अनधिकृत बांधकामांचे संरचनात्मक लेखापरिक्षण तसेच घाटकोपरसह संपूर्ण मुंबईतील होर्डिंगच्या तपासणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२६ च्या पावसाळयापूर्वी, ३० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेल्या शहरातील ६२ धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण केले. यामध्ये ३२ इमारती धोकादायक (सी-१) निश्चित करुन यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिनांक २६ मे, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईत पावसाळयात पाणी साचणाऱ्या संभाव्य ठिकाणांची निश्चिती दरवर्षी केली जाते. सन २०२४-२०२५ मध्ये अशी ठिकाणे ४३१ इतकी होती. सन २०२५-२०२६ मध्ये सदर ठिकाणे ४९६ इतकी निश्चित करण्यात आली आहेत. मुंबई शहर व उपनगरातील पाण्याचा निचरा करण्याकरिता ६ प्रमुख पंपिंग स्टेशन्स आणि ९ लघुपंपिंग स्टेशन कार्यान्वित आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी एकूण ५४७ पाणी उपसा पंप, तसेच वाहनावर बसविलेले १० उपसा पंप कार्यरत करण्यात आलेले आहेत. मुख्य पंपिंग स्टेशन्स व ५४७ पाणी उपसा पंपांचा live feed आपत्कालीन व्यवस्थापन नियंत्रण कक्षास उपलब्ध करुन देण्यात आला आहे, यामुळे पाण्याचा उपसा करणाऱ्या पंपाच्या कार्यान्वयनावर देखरेख ठेवण्यात येते.

(३) प्रतिवर्षी पावसाळ्यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई शहर व मुंबई उपनगर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांच्या रेल्वे विभागासमवेत बैठका आयोजित करण्यात येतात व आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातात.
महानगरपालिकेच्या आपत्कालीन विभागामार्फत दरवर्षी मान्सून सज्जता कृती आराखडा निश्चित करुन महानगरपालिका व रेल्वे यांनी करावयाच्या कामाबाबत सुनिश्चिती करण्यात येते.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाअंतर्गत एकूण ४ वैद्यकिय महाविद्यालये व रुग्णालये, १६ उपनगरीय रुग्णालये, २३६ आरोग्य केंद्र, १८८ दवाखाने, २४६ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ३० प्रसुतीगृहे इतक्या माध्यमातून आरोग्य सेवा पुरविण्यात येते.

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या आजारावर उपचार करण्यासाठी महानगरपालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये ३००० खाटा राखीव ठेवण्यात आल्या असून महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य सेवांमध्ये समन्वय राखण्याकरिता कस्तुरबा रुग्णालयात २४ तास सुरु असणारा "साथरोग नियंत्रण कक्ष" स्थापन करण्यात आला आहे. तसेच महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रावर पुरेसा औषधांचा साठा उपलब्ध ठेवण्यात आला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कालबध्द पद्धतीने "Odd Article Removal Program" अंतर्गत उपाययोजना व धुम्र फवारणी केली जाते. साथींच्या आजाराबाबत नागरिकांमध्ये समुपदेशन करण्याकरिता माहिती, शिक्षण आणि संवाद मोहिम राबविण्यात आल्या आहेत.

महानगरपालिकेच्या २६ प्रशासकिय विभागांमध्ये "पावसाळा नियंत्रण कक्ष" तसेच आरोग्य केंद्र स्तरावर "रॅपीड रिस्पॉन्स टीम" तयार करण्यात आली आहे.

तसेच आपत्कालीन व्यवस्थापनाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेचा मध्यवर्ती आपत्कालीन नियंत्रण कक्ष तसेच २६ प्रशासकिय विभागांमध्ये आपत्ती नियंत्रण कक्ष कार्यरत आहेत. आपत्ती मदत सेवा क्रमांक १९१६ च्या ३० हंटिंग लाईन्स कार्यरत असून विभागीय नियंत्रण कक्षांकरिता स्वतंत्र मोबाईल क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
बृहन्मुंबईत उद्धवणाऱ्या पूरस्थितीचे निरिक्षण व उपाययोजना करण्याकरिता १२००० पेक्षा जास्त सिसिटीव्हींचे थेट प्रक्षेपण नियंत्रण कक्षात उपलब्ध आहे.

आपत्कालीन परिस्थितीत संदेशवहन सुरळीत सुरु रहावे याकरिता थेट दूरध्वनी, भ्रमणध्वनी, व्हीसॅट आधारित हॉटलाईन्स, बिनतारी यंत्रणा, हॅम रेडीओ प्रणाली उपलब्ध आहे. बृहन्मुंबई परिसरात पूरसंभाव्य स्थिती उद्धवल्यास नागरिकांच्या स्थलांतराकरिता अग्निशमन दलाच्या ६ प्रादेशिक समादेशन केंद्रांवर पूर बचाव पथके साधनसामुग्रीसह सज्ज ठेवण्यात आली आहेत. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक, नौदल, आर्मी, तटरक्षक दल यांचीही पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. समुद्र चौपाट्यांवरील सुरक्षिततेकरिता ९२ जीवरक्षक तैनात करण्यात आले आहेत. मुंबईत होणाऱ्या पावसाची व आणीबाणी संपर्क क्रमांकांची माहिती नागरिकांकरिता थेट मोबाईल ॲप व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(५) मुंबईतील संभाव्य दरडी कोसळण्याच्या २४९ ठिकाणांपैकी ४६ अतिधोकादायक ठिकाणी (६ शहर व ४० उपनगर) गृहनिर्माण विभागाच्या दिनांक ४ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, ९ मीटरच्या खालील संरक्षक भिंतीचे बांधकाम म्हाडा मार्फत व ९ मीटरवरील उंचीच्या संरक्षक भिंतींचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे. उपनगरातील ४० अतिधोकादायक ठिकाणी करावयाच्या ३२ कामांपैकी कुर्ला येथील सोनीया गांधी व असल्फा व्हिलेज आणि विक्रोळी येथील सुर्यानगर येथे जीओ नेटींगची कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली आहेत.
सन २०२६ मध्ये ३२ पैकी ३० कामांची ठिकाणे तसेच नव्याने अंतर्भुत झालेली २ ठिकाणे अशा ३२ ठिकाणांचे पुन्हा एकदा भारतीय भौगोलिक सर्वेक्षण विभागामार्फत पुन:सर्वेक्षण करुन घेण्यात आले असून प्राप्त अहवालात नमूद केलेल्या तातडीच्या उपाययोजना करण्याबाबत सर्व संबंधित यंत्रणांना निर्देशित करण्यात आले आहे.

(६) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अनधिकृत बांधकामांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येत नाही. अनधिकृत बांधकामांबाबत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार निष्कासनाची कारवाई नियमितपणे करण्यात येते.

जाहिरात फलक कोसळून दुर्घटना टाळण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाने राज्यातील सर्व महानगरपालिकेसाठी “महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे व जाहिरात प्रसिद्ध करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२”, दिनांक ९ मे, २०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये व नगरपरिषदा व नगरपंचायतीसाठी दिनांक २२ जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक तत्व निर्गमित करण्यात आली आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित केली असून त्यामधील तरतुदीनुसार दरवर्षी पावसाळ्यापूर्वी जाहिरातदारांकडून जाहिरात फलकांच्या संरचनेबाबत नोंदणीकृत असलेल्या अभियंता यांच्याकडून स्थैर्यता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येते.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असणाऱ्या एकूण ९६४ अधिकृत होर्डिंगबाबत संबंधित जाहिरातदारांकडून दिनांक १ जानेवारी, २०२५ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२६ या कालावधीकरिता स्थैर्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यात आले आहेत.

-----------------

**मनोर - वाडा (जि.पालघर) येथे रस्ता अपघातात चार व्यक्तींचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१२)** * **३९९५४ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मनोर - वाडा - भिवंडी या ६४ कि.मी. रस्त्याच्या कामास शासनाने ८०१ कोटी रुपये मंजूर केले असून हे काम मे.ईगल इन्फ्रा इंडिया प्रा.लि. या कंपनीला देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याचे काम संथगतीने सुरु असून निकृष्ट दर्जाचे झाल्याने दोन महिन्यातच रस्त्याला भेगा पडून खड्डे पडले असल्याने प्रचंड वाहतूक कोंडी होऊन अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, रस्त्याचे काम सुरु असताना सुरक्षेचे कोणतेही नियम पाळण्यात येत नसल्याने गत दोन महिन्यात ५ कि. मी. च्या अंतरात ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे ३ ठिकाणी झालेल्या अपघातात ४ व्यक्तींचा मृत्यू झाल्याने नागरिकांनी हमरापूर येथे आंदोलन केल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने संबंधित कंपनीवर/ठेकेदारावर कोणती कारवाई केली व मृतांच्या नातेवाईकांना मोबदला मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर कामाचे मे. ईगल इन्फ्रा इंडिया प्रा.लिमिटेड यांना दि.१५.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ३० महिने म्हणजेच दि.१४.४.२०२७ पर्यंत आहे. तसेच मनोर ते वाडा कि.मी. ३१/१५० ते ३५/३८० (४.२३० कि.मी.), कि.मी. ४०/०७० ते ४३/१६० (३.०९० कि.मी.) व कि.मी.४३/८५० ते ४७/६८० (३.८३० कि.मी.) असे एकूण ११.१५० कि.मी. लांबीतील दुपरीकरण काँक्रीटीकरणाचे काम आजमितीस पूर्ण करण्यात आलेले असून, सदर भाग वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल २०२५ ते आजमितीस या रस्त्यावर ४ अपघातांची नोंद झालेली असून २ व्यक्ती मयत झालेल्या आहेत. यापैकी ३ अपघाताच्या ठिकाणी वाहनचालकांनी वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे अपघात घडल्याचे पोलीस विभागामार्फत प्राप्त प्रथम खबर अहवालात नमूद आहे. तसेच दि.१७.४.२०२६ रोजी घडलेल्या एका अपघातासाठी कंत्राटदारास जबाबदार धरण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.
(४) पोलीस विभागाच्या प्रथम खबर अहवालानुसार सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.१९.११.२०२५ च्या शासन निर्णयान्वये मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्यात नमुद कार्यपध्दतीप्रमाणे सदर प्रकरणाचा तपास पूर्ण करून पीडीतांना मदत करण्याविषयीचा निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## पैठण-पंढरपूर पालखी रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वारकऱ्यांना होत असलेल्या गैरसोयींबाबत

**(१३) * ३७८५८ श्री.विलास भुमरे (पैठण), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण-पंढरपूर पालखी महामार्गासाठी केंद्र शासनामार्फत सन २०१७ मध्ये पैठण ते अहमदनगर जिल्ह्यातील खर्डा पर्यंतच्या ११५ कि.मी. रस्त्यास राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देऊन एकूण ४८७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून हैदराबाद येथील कंत्राटदारास काम देण्यात आले असून, काम दोन वर्षांत पूर्ण होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात सन २०१७ पासून आजपर्यंत सात वर्षांनंतरही काम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित कंत्राटदारास काम अपूर्ण असतानाही सुमारे २९२ कोटी इतकी रक्कम (एकूण निधीच्या सुमारे ६० टक्के) अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या महामार्गातील शेवगांव-पाथर्डी तालुक्यातील ५० कि.मी. च्या महामार्गासाठी केलेल्या भूसंपादनाचा शेतकऱ्यांना मोबदला मिळालेला नसल्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलने, रस्ता रोको, उपोषणे केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने पैठण-पंढरपूर पालखी महामार्गाचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला तात्काळ अदा करण्यासह निधी वितरणातील अनियमितता व विलंबाबाबत संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशतः खरे आहे.

पैठण-हादगाव-शिरूर-खर्डा (पालखी मार्ग) हा रस्ता दि. ०३ जानेवारी २०१७ रोजीच्या भारतीय राजपत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२-ई असा घोषित झाला आहे. या महामार्गाची एकूण ११० कि.मी. लांबी सा. बां. विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या आखत्यारीत येते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयामार्फत रा.म. क्र. ७५२-ई वरील पैठण ते शिरूर (Package-१) या ५५.९३७ कि.मी. लांबीकरिता दि. ०१ मार्च २०१७ रोजी रु. ३४१.८० कोटी व शिरूर ते खर्डा (Package-२) या ५४.१०९ कि.मी. लांबीकरिता दि. १७ फेब्रुवारी २०१७ रोजी रु. ३८१.७७ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता.
(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

रा.म. क्र.७५२-ई वरील पैठण ते शिरूर या पॅकेज क्र. १ च्या कामास दि. ०२ जून २०१७ रोजी कंत्राटदार मे. आरसीएम पीव्हीआर (जे.व्ही.) हैद्राबाद व शिरूर ते खर्डा या पॅकेज क्र. २ च्या कामास दि. १७ जून २०१७ रोजी कंत्राटदार मे मधुकॉन-शारदा-सत्यसाईबाबा (जे.व्ही.) यांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सध्यास्थितीत पैठण ते शिरूर या एकूण ५५.९३७ कि.मी. लांबीपैकी ४९.९१४ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले असून शिरूर ते खर्डा या एकूण ५४.१०९ कि.मी. लांबीपैकी ४९.७१ कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम प्रगतीत असून जुलै अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कोविड परिस्थिती, भूसंपादन प्रक्रियेतील अडचणी, स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध इ. कारणांमुळे महामार्गावरील सदर कामे पूर्ण होण्यास विलंब झाला आहे.

सद्यस्थितीत पैठण ते शिरूर या पॅकेज क्र. १ च्या कामाकरिता रू. २०३.७६ कोटी व शिरूर ते खर्डा या पॅकेज क्र. २ च्या कामाकरिता रु. २१६.८४ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.
(४) हे अंशतः खरे आहे

रा.म.क्र. ७५२ ई या महामार्गावरील शेवगाव ते पाथर्डी या एकूण ३९.०४ कि.मी. लांबीतील भूसंपादनाचा मोबदला मिळाला नसल्यामुळे काही ठिकाणी शेतकऱ्यांनी आंदोलने, रास्ता रोको उपोषणे केली आहेत.
(५) व (६) रा.म. क्र. ७५२ ई वरील पैठण ते शिरूर व शिरूर ते खर्डा या दोन्ही पॅकेज मधील भूसंपादनाचे अंतिम निवाडे प्राप्त झाले असून भूसंपादनासाठी लागणाऱ्या वाढीव निधीचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीकरीता सादर करण्यात आला आहे. सदरील प्रस्तावास मंजुरी मिळताच भूसंपादनाचा मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

पैठण ते शिरूर या पॅकेज क्र. १ मधील कंत्राटदारास कामाच्या संथ प्रगतीबाबत नोटीस देण्यात आली आहे.

-----------------

## पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील खाजगी रुग्णालय व धर्मादाय रुग्णालयात गरीब रुग्णांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या मोफत खाटांबाबत

**(१४) * ३९९२७ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे, पिंपरी चिंचवड शहरातील अनेक मोठ्या खासगी रुग्णालयांना महापालिकेकडून अतिरिक्त एफएसआय देताना गरीब रुग्णांसाठी मोफत अथवा अल्प दरात उपचार देणे रुग्णालयांना बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरिक्त एफएसआयच्या बदल्यात गरीब रुग्णांसाठी मोफत खाटा राखीव ठेवण्याची अट असतानाही प्रत्यक्षात या सुविधेचा अत्यल्प वापर होत असल्याचे वास्तव दिनांक २८ मे, २०२६ रोजी वा त्या दरम्यान माहितीच्या अधिकारात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक, सह्याद्री हॉस्पिटल, कर्वे रस्ता आणि केकेआय इन्स्टिट्यूट या रुग्णालयांमध्ये एकूण १९ मोफत खाटा राखीव ठेवण्याच्या अटीनुसार दरवर्षी सुमारे ६९३५ रुग्णांना मोफत उपचार मिळणे अपेक्षित होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागील तीन वर्षात रुबी हॉलमध्ये केवळ ७२, सह्याद्री हॉस्पिटलमध्ये ७९ आणि के के आय मध्ये ७५ रुग्णांनाच व औंध येथील इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, एम्स रुग्णालयातही या सुविधेचा गरीब रुग्णांना अत्यल्प लाभ देण्यात आल्याचे माहितीच्या अधिकारात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने शहरातील गरजू रुग्णांना मोफत उपचार मिळण्याकरिता खाजगी रुग्णालय व धर्मादाय रुग्णालयातील मोफत खाटांचा वर्षभर पूर्ण क्षमतेने वापर होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे मनपामध्ये अतिरिक्त एफएसआय देताना गरीब रुग्णांसाठी मोफत अथवा अल्प दरात उपचार देणे बंधनकारक आहे. तथापि, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम तसेच एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतूदीनुसार बिर्ला हॉस्पिटल, थेरगाव व डी. वाय. पाटील हॉस्पिटल, पिंपरी यांना वाढीव FSI मंजूर केला आहे. परंतू, वरील नियमावलीत गरीब रुग्णांसाठी मोफत खाटा राखीव ठेवण्याची अट नमूद केलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) पुणे शहरातील रुबी हॉल क्लिनिक, सह्याद्री हॉस्पिटल, के.के.आय इन्स्टिट्यूट, औंध इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, एम्स रुग्णालय या हॉस्पिटलच्या दर्शनी भागात फ्री बेड सुविधेबाबतचे माहिती फलक लावण्यात आलेले आहेत.

तसेच, सर्व प्रकारच्या मराठी व उर्दू वृत्तपत्रामध्ये फ्री बेड सुविधेबाबतचे जाहीर प्रकटन देऊन जनजागृती करण्यात येते.

-----------------

## पुणे येथील कोंढवा परिसरात झालेली क्लोरिन वायूची गळती

**(१५) * ३७८९१ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील कोंढवा परिसरातील गंगाधाम भागात बंद पडलेल्या जलशुद्धीकरण केंद्रामधील क्लोरिन गॅस टाकीतून गळती होऊन परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गॅस गळतीमुळे फायर ब्रिगेडच्या दोन जवानांसह एकूण २४ जणांना श्वास घेण्यास त्रास होऊन त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बंद अवस्थेतील जलशुद्धीकरण केंद्रामध्ये धोकादायक क्लोरिन गॅसची टाकी योग्य सुरक्षा उपाययोजना न करता ठेवण्यात आल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित जलशुद्धीकरण केंद्र, त्याचे व्यवस्थापन, देखभाल करणारी यंत्रणा व जबाबदार अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, तत्सम स्वरुपाची घटना ही बिबवेवाडी परिसरातील एका मोकळ्या गोडाऊनच्या जागेत क्लोरीन वायू गळतीची घटना घडली होती.

(२) अंशत: खरे आहे.

सदर घटनेची माहिती प्राप्त होताच पुणे महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून वायू गळती नियंत्रण, परिसर रिकामा करणे, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे तसेच बाधित नागरिकांना वैद्यकीय उपचारासाठी पाठविणे अशा आवश्यक आपत्कालीन उपाययोजना केल्या, तातडीच्या समन्वित प्रतिसादामुळे परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली व कोणतीही जीवितहानी झाली नाही. १७ नागरिकांना व अग्निशमन दलाच्या दोन कर्मचाऱ्यांनाही याबाबत किरकोळ बाधा झाल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

(३) सदर घटना जलशुद्धीकरण केंद्रामध्ये घडलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना नदीत झालेले प्रदूषण

**(१६) * ३५४५० श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना नदीत पुनावळे परिसरात जनावरांचे मांस, प्लास्टिक पिशव्या व दूषित कचरा मोठ्या प्रमाणावर टाकला जात असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवना नदीतील वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम झाला असून दूषित व रसायनयुक्त पाणी शहराला पुरवले जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित जबाबदार दोषींवर कारवाई करण्यासह शहराला शुद्ध पाणी पुरवठा मिळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत सदर जागेचा पंचनामा करुन रावेत पोलीस स्टेशन, सेक्टर नं.३२ वाल्हेकरवाडी रोड, रावेत या ठिकाणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध जल प्रदूषण अधिनियम, १९७०, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ तसेच भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.), २०२३ नुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रावेत पोलीस स्टेशन यांच्यामार्फत चालू आहे. पवना नदीतील पाण्याचा उपसा बंद करुन थेट धरणातून पिण्यासाठी पाणी उचलण्याची बाब व प्रकल्प नियोजनाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई येथे हायब्रीड ॲन्युईटी कामात झालेला गैरव्यवहार

**(१७) * ३२७०२ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोकण भवन (नवी मुंबई) येथील अधिक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता, पनवेल व इतर कार्यकारी अभियंता यांना हाताशी धरून सन २०२२ ते २०२५ या कालावधीत हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत

टप्पा क्र. २ या अंतर्गत कामासाठी कोट्यवधी रुपयांची निविदा प्रक्रिया राबवली असून यातील बहुतांश कामे यापुर्वीच झाल्याने त्यात मोठा गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, पनवेल यांनी किरकोळ दुरुस्ती व विशेष दुरुस्तीच्या नावाखाली प्रत्यक्ष काम न करता कोट्यवधी रुपयांची बनावट देयके सादर करून शासनाची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यमार्ग क्रमांक १०३,१०४,१०५ आणि १०८ या मार्गावरील रस्ते सुधारण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीतून ही निकृष्ट दर्जाची कामे काढण्यात आली असून अधिक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता, पनवेल व त्यांचे तीन उपअभियंता यांनी संगनमताने यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भ्रष्टाचार व अनियमिततेचे प्रकरण माहे, जुलै २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने संबधित दोषी अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

हायब्रीड ॲन्युईटी टप्पा क्र.२ अंतर्गत मंजूर कामे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (MSIDC) मार्फत करण्यात येत असून हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत टप्पा क्र. २ अंतर्गत खुल्या निविदा प्रक्रिया राबवून माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२४ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

नमूद करण्यात येते की, प्रश्नामध्ये नमुद केलेल्या राज्यमार्ग क्र. १०३, १०४, १०५ व १०८ या रस्त्यांवर हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल टप्पा २ अंतर्गत कुठलेही काम मंजूर नाही.

रा.मा. १०४ या रस्त्यावर हायब्रीड ॲन्युईटी टप्पा क्र.१ अंतर्गत काम सन २०२० साली पुर्ण झाले असून सद्यस्थितीत सदर कामाच्या ॲन्युईटीचे सहावे वर्ष चालू आहे. सदर कामाचा Operation and Maintenance कालावधी हा २०३० पर्यंत आहे. या लांबीत दुरूस्तीसाठी शासन निधीतून वेगळ्याने खर्च करण्यात आलेला नाही.

प्रश्नामध्ये नमूद करण्यात आलेले इतर रस्ते रा.मा. १०३, १०५ व १०८ या रस्त्यावर अर्थसंकल्प व केंद्रीय मार्ग निधी (CRF) अंतर्गत मंजूर कामे पूर्ण करण्यात आली असून सदर रस्ते सुस्थितीत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईतील हॅंकॉक पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१८) * ३४४१० श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण मुंबईतील हॅंकॉक पुलाच्या पुनर्बांधणीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये कार्यारंभ आदेश जारी करुनही आजतागायत पुलाचे काम प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू हॅंकॉक पुलाचे काम १९ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु अनेकदा पुनर्बांधणी योजना बदलण्यात येऊन बांधकाम आराखडयात बदल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(३) तसेच, वेळेत काम पूर्ण न झाल्यामुळे कंत्राटदाराला माहे ऑगस्ट, २०२१ पर्यत मुदतवाढ देऊन सहा वर्षाचा कालावधी उलटूनही अदयाप पुलाचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भायखळा येथील हँकॉक पुलाच्या पुनर्बांधणीची प्रलंबित कामांबाबत निर्णय घेण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक २७ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यादरम्यान व त्यानंतर अनेकदा महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक, मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित जबाबदार अधिकारी/ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने हँकॉक पुलाच्या पुनर्बांधणीकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी कार्यादेश देण्यात आले.

सदर पुलाचे काम दोन टप्प्यात करण्यात येत असून पहिल्या टप्प्यात उपलब्ध असलेल्या जागेनुसार पुलाचे बांधकाम करण्यात आले. सद्य:स्थितीत पुलाची एक-एक मार्गीका दिनांक १ ऑगस्ट, २०२२ पासून सुरु करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

हँकॉक पुलाच्या बांधकामासंदर्भात कार्यादेश दिल्यानंतर रेल्वे विभागाने, भारतीय मानकानुसार (IS Code) आय.आय.टी., मुंबई यांनी संरचनात्मक बदल करण्याची शिफारस केली. त्यास दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी मान्यता घेण्यात आली.

यानंतर वेळोवेळी उद्भवलेल्या तांत्रिक अडचणींमुळे सदर कामास दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्याप्रमाणे उपलब्ध असलेल्या जागेनुसार पुलाच्या दोन्ही बाजूच्या एक-एक मार्गीकेचे काम पूर्ण करुन दिनांक १ ऑगस्ट, २०२२ रोजी सदर पूल वाहतूकीसाठी खुला करण्यात आला.

उर्वरित दोन मार्गिकांचे बांधकाम, म्हाडामार्फत दुरुस्ती करण्यात येणाऱ्या ३ उपकर प्राप्त इमारती व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितील १७ खाजगी व्यावसायिक गाळे नियत रेषेने (Regular Line) बाधित होत आहेत. तसेच तीन उपकर प्राप्त इमारतींपैकी एका इमारतीच्या संदर्भात व १७ पैकी दोन व्यावसायिक गाळयांसंदर्भात प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

सदरची बांधकामे निष्कासित केल्यानंतर स्वतंत्र निविदा प्रक्रिया करुन पुलाचे उर्वरित काम करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नियोजन आहे.

यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार व पत्रव्यवहारानुसार महापालिका स्तरावर बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील सुरुची परिसरात सनटेक गृह प्रकल्पामुळे पर्यावरणीय धोका निर्माण झाल्याबाबत

**(१९) * ३५३०९ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील सुरुची परिसरात सनटेक रिॲल्टी लि. कडून मोठ्या प्रमाणावर निवासी विकास प्रकल्प सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प हा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात येत असून, त्यासाठी आवश्यक पर्यावरणीय मंजुरी व किनारपट्टी नियंत्रण क्षेत्र यांची परवानगी न घेता या प्रकल्पास वसई विरार महानगरपालिकेकडून मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे कांदळवन, हरित पट्टा, जलस्रोत व स्थानिक जैवविविधतेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असल्याचे स्थानिक नागरिक भिती व्यक्त करत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाविरोधात स्थानिक नागरिकांकडून आक्षेप नोंदविले असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी या प्रकल्पाचे पर्यावरणीय लेखापरीक्षण शासन करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित विकासक व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पास विनियम व प्रचलित नियम व प्रचलित अधिनियमानुसार पर्यावरणाच्या दृष्टीने Environmental Clearance (MOEF), Wetland NOC तसेच CRZ बाबत MCZMA NOC आवश्यक आहे.

संबंधित विकासक यांनी MOEF Clearance, Wetland NOC तसेच, MCZMA NOC सादर केलेली आहे. त्यानंतर UDCPR २०२० मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेकडून बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.

Wetland NOC वरील स्वाक्षरी बाबत महानगरपालिकेस तक्रार प्राप्त झालेली होती. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेने अनुक्रमे दि. २९ ऑक्टोबर, २०२५ व दि. २० मे, २०२६ रोजीच्या पत्राद्वारे सक्षम प्राधिकरणास कळविण्यात आलेले आहे. परंतू अहवाल प्राप्त न झाल्याने दि. १८ जून, २०२६ रोजीच्या पत्रान्वये सक्षम प्राधिकरणास सुस्पष्ट अहवाल सादर करणेकरिता कळविण्यात आले आहे. परंतु अद्याप त्यांचा अहवाल अप्राप्त आहे.
(४) हे खरे नाही.

दाखल प्रस्तावात बांधकाम परवानगी मिळण्याच्या अनुषंगाने संबंधित विकासक यांनी आवश्यक असलेल्या सर्व कागपत्रांची पूर्तता केल्याचे दिसून येते. त्यानुसार बांधकाम परवानगी देण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात आलेली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी मद्य प्राशनामुळे १६ जणांचा झालेला मृत्यू

**(२०) * ४०७४३ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी मद्य प्राशनामुळे १६ जणांचा मृत्यू झाल्याची तसेच सदर दारूमध्ये मिथेनॉल मिसळण्यात आल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या मद्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्ह्यात मागील तीन वर्षांत अवैध मद्यनिर्मिती व विक्रीसंदर्भात किती गुन्हे नोंदविण्यात आले आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने विषारी दारूची निर्मिती, साठवणूक व विक्री करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह तसेच राज्यात अवैध व विषारी दारू विक्रीला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील दापोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फुगेवाडी, दापोडी परिसरात तसेच पुणे पोलीस आयुक्तालयातील हडपसर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पांढरे मळा परिसरात मिथेनॉल मिश्रित गावठी दारू सेवन केल्याने दिनांक २६ मे ते २८ मे, २०२६ दरम्यान एकूण २२ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर घटनेच्या अनुषंगाने दिनांक २९.०५.२०२६ रोजी दापोडी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. ११४/२०२६ व हडपसर पोलीस स्टेशन येथे गु.रजि. नं.०३७९/२०२६ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यांच्या तपासामध्ये एकूण १७ आरोपी निष्पन्न झाले असून सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. सदर प्रकरणाचे गांभीर्य पाहून दोन्ही गुन्ह्यांचे तपास दिनांक २९.०५.२०२६ रोजी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

सदर दुर्घटनेतील मुख्य दोन आरोपींस राज्य उत्पादन शुल्क विभागाने अटक करून पोलीसांच्या ताब्यात दिले. तसेच अन्य तीन आरोपींना अटक करून त्यांच्या विरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री संदर्भात पुणे जिल्ह्यात गेल्या तीन वर्षात खालीलप्रमाणे कारवाया करण्यात आल्या आहेत :

| **कालावधी** | **एकूण गुन्हे** | **अटक आरोपी** | **जप्त मुद्देमाल (रूपये कोटीत)** |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | २५६५ | १८५२ | ९ |
| २०२४-२५ | ३१५९ | २५५६ | १५ |
| २०२५-२६ | ३८६० | ३६२२ | २० |
| २०२६-२७ (३० जून अखेर) | ७८६ | ७२० | ३ |
| एकूण | १०३७० | ८७५० | ४७ |

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री संदर्भात राज्यात गेल्या तीन वर्षात खालीलप्रमाणे कारवाया करण्यात आलेल्या आहेत:

| **कालावधी** | **एकूण गुन्हे** | **अटक आरोपी** | **जप्त मुद्देमाल (रूपये कोटीत)** |
|---|---|---|---|
| २०२३-२४ | २९७२१ | २०५३७ | ६९ |
| २०२४-२५ | ३०१५२ | २१६०७ | ९२ |
| २०२५-२६ | ३१०२१ | २३५२१ | १०२ |
| २०२६-२७ (३० जून अखेर) | ९१५४ | ६९५५ | २६ |
| एकूण | १,००,०४८ | ७२६२० | २८९ |

मद्य निर्मिती, वाहतूक, विक्री साखळीमधील अनुज्ञप्तींचे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १६४ क्षेत्रीय कार्यकारी घटकामार्फत तसेच पर्यवेक्षीय घटकामार्फत वेळोवेळी निरीक्षण करण्यात येत असून नियमभंग आढळल्यास विसंगती प्रकरण नोंदवून कारवाई करण्यात येते. तसेच, अवैध मद्य /हातभट्टी दारू निर्मिती, वाहतूक, विक्री इ. बाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यरत असलेल्या ५७ भरारी पथक व २७ सिमा तपासणी नाक्यांमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशी (जि.ठाणे) कृषी उत्पन्न बाजार समितीत कृत्रिमरीत्या आंबे पिकविण्यासाठी रसायनांचा वापर होत असल्याबाबत

**(२१) * ३२८७० श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी (जि.ठाणे) कृषी उत्पन्न बाजार समिती येथे कृत्रिमरीत्या आंबे पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाईडसह बंदी घातलेल्या रसायनांचा वापर होत असल्याच्या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार व थेट पणन केंद्रांमध्ये फळे, भाज्या, मसाले व सुकामेवा यामध्ये घातक रसायनांचा वापर करून कृत्रिमरीत्या रंग, चमक व टिकाऊपणा वाढविण्याचे प्रकार वाढत असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काही व्यापारी व संबंधित यंत्रणांतील घटकांच्या संगनमताने भेसळयुक्त शेतमालाची विक्री होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील एपीएमसी बाजारांमध्ये फळांच्या कृत्रिम पक्वतेसाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांची तपासणी करण्यासाठी शासनाकडे मान्यताप्राप्त प्रयोगशाळा, Rapid Detection Kits किंवा Mobile Food Testing Labs उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गत तीन वर्षांत कृत्रिमरीत्या पिकवलेल्या फळांचे अपात्र ठरलेले नमुन्यांच्या प्रकरणांत दाखल केलेले गुन्हे, परवाना निलंबन किंवा केलेली दंडात्मक कारवाई तसेच एपीएमसी बाजार समित्या, अन्न व औषध प्रशासन, कृषी विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यात अस्तित्वात असलेली समन्वित तपासणी यंत्रणा आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करणे व अन्न सुरक्षा कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यासह फळ बाजारांमध्ये QR आधारित ट्रेसिबिलिटी प्रणाली, ऑन-साईड केमिकल डिटेक्शन, नियमित संयुक्त तपासणी मोहीम आणि शासनामार्फत ग्राहक जनजागृती अभियान राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

आंबे पिकविण्यासाठी इथिलीन स्प्रेचा वापर होत असल्याच्या संशयावरून ठाणे जिल्हा स्थित वाशी (Vashi APMC Market) येथील मे. श्रीकृष्ण राधेश्याम जैस्वाल, ओपन शेड, एपीएमसी फ्रूट मार्केट, प्लॉट क्र. ३/७, सेक्टर १९, तुर्भे, नवी मुंबई येथे दिनांक ०२/०५/२०२६ रोजी आंबा या अन्न पदार्थांचे २ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून सदर अहवाल अद्याप प्रलंबित आहे. तसेच सदर आस्थापनेतून रुपये १८२०/- किमतीचा २६ किलो आंब्याचा साठा जप्त केला आहे. दिनांक ३०.०५.२०२६ रोजी मे. देविदास बाबुराव मुळे, एपीएमसी फ्रूट मार्केट, सेक्टर १९, तुर्भे, वाशी, नवी मुंबई येथे आंबा या अन्न पदार्थांचे २ अन्न नमुने घेण्यात आले असून सदरचे दोन्ही नमुने असुरक्षित घोषित केले आहेत त्यामुळे अन्न सुरक्षा मानके कायद्यांतर्गत सदर आस्थापनेचा परवाना रद्द करण्यात आला असुन आस्थापनेतून रुपये ४,५३,२५०/- किमतीचा आंब्याचा साठा जप्त केला आहे.

दिनांक ३०.०५.२०२६ रोजी मे. नौशादअली समिरुल्ला शेख, गाळा नं. २१८ एक्स्पोर्ट कॉम्प्लेक्स बिल्डिंग, फ्रूट मार्केट, एपीएमसी वाशी, गेट नंबर १, वाशी, नवी मुंबई या विनानोंदणी आस्थापनेतून आंबा या अन्न पदार्थांचा अन्न नमुना घेण्यात आला असून सदर अन्न नमुना असुरक्षित घोषित झाला आहे. तसेच सदर आस्थापनेतून १५०० किलो रुपये ५,४९,०००/- किमतीचा आंब्याचा साठा जप्त केलाअसुन सदरचा अन्न पदार्थ हा नाशवंत असल्याने नष्ट करण्यात आला आहे. तसेच उपरोक्त प्रकरणी प्राप्त विश्लेषण अहवालांच्या अनुषंगाने संबंधितांवर कायद्यातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई करण्यात येत आहे व विनानोंदणी आस्थापना प्रकरणी तडजोड प्रकरण दाखल करण्यात आले असून तडजोड शुल्क रुपये २५००० /- शासन जमा करण्यात आले आहेत.

(२) हे अंशतः खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे कार्यालयामार्फत दिनांक २६/०५/२०२६ मे.एम आर फ्रुट सप्लायर, मिळकत नं २२४२, मु.पो-निमगाव केतकी ता-इंदापूर जि-पुणे या ठिकाणी तपासणी केली असता इथरेलचा स्प्रे पाण्यात टाकून आंब्यांवर फवारणी करुन आंबे पिकवत असल्याचे निदर्शनास आले.

त्यानुषंगाने सदर पेढीतून आंबा हा नमुना विश्लेषणासाठी घेण्यात आला असून आंब्याचा उर्वरित साठा कमी दर्जा असल्याच्या संशयावरून,तसेच इथरेल स्प्रेचा उपयोग करुन आंबे पिकवत असल्यामुळे जप्त करण्यात आला आहे. सदर नमुन्याचा अहवाल प्रलंबित आहे. सदर पेढी विना नोंदणी अन्न व्यवसाय करत असल्याने संस्थेस अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत कलम ६९ नुसार २५,००० एवढा दंड आकरण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील एपीएमसी बाजारांमध्ये फळांच्या कृत्रिम पक्वतेसाठी कॅल्शियम कार्बाईडसह वापरल्या जाणाऱ्या रसायनांची तपासणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या मुंबई, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथील अन्न चाचणी प्रयोगशाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत.

अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत आवश्यकतेनुसार नमुने संकलित करून त्यांची तपासणी करण्यात येते. तसेच, राज्यामध्ये कीटकनाशकांचे अवशेष, जंतुनाशकांचे अंश, कृत्रिमरीत्या आंबे पिकवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कॅल्शियम कार्बाईडचे अंश तसेच इतर अपायकारक रासायनिक घटकांची तपासणी करण्यासाठी भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI) यांच्याकडून अधिसूचित व NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. आवश्यकतेनुसार नमुने तपासणीसाठी संबंधित प्रयोगशाळांकडे पाठविण्यात येतात. सदर रसायनांच्या तपासण्या मोबाईल फूड टेस्टिंग लॅब्सद्वारे व फूड सेफ्टी ऑन व्हिल्स द्वारे करणे शक्य आहे. सध्या अन्न व औषध प्रशासनामार्फत ०२ ठिकाणी (बृहन्मुंबई व छत्रपती संभाजीनगर) येथे ०२ FSW कार्यरत आहेत. तसेच अशा प्रकारच्या तपासणीसाठी Rapid Detection Kits उपलब्ध नाहीत.

(५) व (६) अशी समन्वित तपासणी यंत्रणा नाही.

महाराष्ट्र राज्यात अन्न व औषध प्रशासनाने १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२६ या कालावधीत फळांचे एकूण ६१७ नियमित नमुने (Enforcement Samples) घेण्यात आले आहेत. त्यापैकी ३९६ नमुने विहित मानकांनुसार असल्याचे आढळून आले. तसेच २ नमुने हे मानदाप्रमाणे नसल्याचे आढळून आले असून सदर २ नमुन्यांपैकी एक प्रकरणी कलम ६८ अंतर्गत रुपये २५,००० इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच ४ नमुने हे असुरक्षित आल्यामुळे मा.न्यायालयात खटले दाखल करण्यात येत आहे. राज्यात एकूण ११,३४,६७०/- किंमतीचा ४२७९ किलो साठा जप्त करण्यात आला आहे. तसेच ३ विनानोंदणी आस्थापना प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील कलम ६९ नुसार प्रकरणे दाखल करण्यात आली असून एकूण रु. ७५,०००/- दंड ठोठावण्यात आला आहे.

FOSCOS या ऑनलाईन प्रणालीद्वारे नागरिकांना तक्रारी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. वेळोवेळी जनजागृती मोहिम राबविण्यात येते व कार्यक्षेत्रातील अन्न सुरक्षा अधिकारी यांचेमार्फत विविध अन्न आस्थापनांची तपासणी करुन अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे तीन महिन्यात १५४ नागरिकांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२२) * ३९१९८ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाल्याने तीन महिन्यात ४५ अपघातात १५४ नागरिकांचा अपघात होवून जीव गमवावा लागल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या वर्षाच्या तुलनेत १२ मृत्यू अधिक झाले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांच्या अहवालानुसार गेल्या वर्षभरात (२०२५) तब्बल ५१८ अपघातात १९७ जणांचा बळी गेला, यापैकी राष्ट्रीय महामार्गावर १८० अपघातात ९२ जणांचा मृत्यू, राज्य महामार्गावर २५ अपघातात ८ जणांचा मृत्यू तर शहरांतर्गत रस्त्यांवर तब्बल ३१३ अपघातात ९७ जणांना जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार मनपा आयुक्त यांची भेट घेवून रस्ते सुधारणा करणेकामी निवेदन देवून देखिल मनपाकडून रस्ते दुरुस्ती न केल्यामुळे अपघाताच्या संख्येत वाढ होवून नागरिकांना जीव गमवावा लागलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नाशिक शहरातील रस्त्यांची दुरवस्था झालेली नसून, आगामी सिंहस्थ कुंभमेळयाचे पार्श्वभुमीवर शहरातील रस्ते विकास व दुरुस्तीची कामे तसेच पायाभुत सुविधा सुधारण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच नाशिक शहरामध्ये जानेवारी ते मार्च २०२६ या तीन महिन्याच्या कालावधीत एकुण १५४ अपघातांमध्ये ४८ प्राणांतिक अपघातांमध्ये ४८ नागरिकांचा मृत्यू विविध कारणांमुळे झाला आहे.
(२) हे खरे नाही.

जानेवारी ते मार्च २०२५ या वर्षी तीन महिन्याच्या कालावधीत एकुण ६० नागरिकांचा मृत्यू झाले होते तसेच जानेवारी ते मार्च, २०२६ मध्ये ४८ मृत्यू झाले असून तुलनेत १२ मृत्यू कमी झाले आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

नाशिक शहरात गेल्या वर्षी सन २०२५ मध्ये एकुण ५१८ अपघातात २०९ नागरिकांचा मृत्यू झाला असून त्यापैकी राष्ट्रीय महामार्गावर १८० अपघातात ९६ नागरिकांचा, राज्य महामार्गावर एकुण २५ अपघात ८ नागरिकांचा आणि शहरांतर्गत रस्त्यावर एकुण ३१३ अपघातात १०५ नागरिकांचा मृत्यू झाला आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिका आयुक्त यांची भेट घेतली असून रस्ते सुधारणा करण्याबाबत मागणी केली आहे.

सिंहस्थ कुंभमेळा - २०२७ च्या अनुषंगाने एकूण २८ रस्त्यांच्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून एकाचवेळी अनेक एजन्सीमार्फत वेगवेगळी कामे सुरु आहेत. सदरील रस्त्यावर सहा. पोलीस आयुक्त (वाहतुक) नाशिक यांचे अधिसुचनेनुसार Traffic Diversion करण्यात आले असून सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली असून वाहतुकीचे नियोजन करण्यात येते. रस्त्याच्या कामांवर आवश्यकतेनुसार ट्रॅफिक वार्डनची नेमणुक करण्यात आली आहे तसेच कामाच्या विविध ठिकाणी सुरक्षात्मक उपाय योजनेच्या अनुषंगाने Barricading, चेतावणी फलक, रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था, कामगारांसाठी आवश्यक सुरक्षा साधनांची (PPE) उपलब्धता करून देण्यात आली आहे. त्यामुळे उक्त रस्त्यांच्या कामात अपघाताच्या संख्येत वाढ होऊन नागरिकांना जीव गमवावा लागल्याचे दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरातील सांताक्रुझ (पूर्व) येथील कलिना संगम सहकारी गृहनिर्माण संस्थेत पी.ए.पी. सदनिका वाटपात झालेला गैरव्यवहार

**(२३) * ४०८४३ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत प्रकल्पांमध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेल्या पी.ए.पी. सदनिकांची विक्री किंवा हस्तांतरण करण्यास कायदेशीर बंदी असतानाही मुंबई उपनगरातील न. भू. क्र. ४९१७, कलिना (सांताक्रुझ पूर्व)

येथील एस.आर.ए. प्रकल्पात ५३ पी.ए.पी. सदनिकांची बनावट कागदपत्रांच्या आधारे उच्च दराने विक्री झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात विकासक, सोसायटी कार्यकारिणी व काही एस.आर.ए. अधिकाऱ्यांच्या संगनमताने सुमारे २० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा तसेच बनावट वीज बिले व इतर कागदपत्रांचा वापर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पात प्रशासक नियुक्त असतानाही पी.ए.पी. सदनिका हस्तांतरण, नोंदी व वितरण प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे तसेच काही सदनिका प्रत्यक्ष लाभार्थ्यांऐवजी इतर व्यक्तींना विक्री करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषी अधिकारी व इतर संबंधितांवर कारवाई करण्यासह मालमत्ता जप्ती तसेच सदर पी.ए.पी. सदनिका मूळ लाभार्थ्यांना परत मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) मौजे-कोलेकल्याण येथील न.भू.क्र.४९१७ या क्षेत्रावरील कलीना संगम सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस दि. ०२ सप्टेंबर, २००३ रोजी एकुण ९३ झोपडीधारकांसाठी (४० निवासी पात्र व ५३ प्रोव्हिजनल निवासी पीएपी) सुधारीत आशयपत्र प्रदान करण्यात आले होते.

सदर योजनेकरीता निर्गमित करण्यात आलेल्या परिशिष्ट-२ ची माहिती पुढीलप्रमाणे:-

| अ. क्र. | परिशिष्ट दिनांक | पात्र झोपडीधारक |
|---|---|---|
| १. | दि.०६/१२/२००० (मूळ परिशिष्ट-२) | ४० |
| २. | दि.२१/०३/२००२ (पुरवणी परिशिष्ट-२) | १७ |
| ३. | दि.०२/१२/२००४ (पुरवणी परिशिष्ट-२) | २५ |
| ४. | दि.०८/०९/२००५ (पुरवणी परिशिष्ट-२) | ११ |
| | **एकूण** | **९३** |

सदर योजनेतील तेव्हा पात्र असलेल्या ९३ झोपडीधारकांना दिनांक २६ जुलै, २००६ रोजीच्या पूर परिस्थितीमुळे कलीना संगम सहकारी गृहनिर्माण संस्थेने दिनांक ३० जुलै, २००६ रोजी सदनिकांचा ताबा दिला.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दिनांक १७/०१/२००७ रोजीच्या आदेशान्वये, सदर योजनेतील दिनांक ८/९/०२००५ रोजीचे पुरवणी परिशिष्ट-२ रद्द केल्याने त्यामधील ११ झोपडीधारक अपात्र ठरले. परंतु सदर आदेशामध्ये संबंधित झोपडीधारकांच्या पुराव्यांची सत्यता पडताळणीबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या पात्रतेबाबत निर्णय घेण्याचे नमूद आहे. सदर ११ झोपडीधारकांची पात्रता व समावेशन सद्य:स्थितीत ग्राह्य धरण्यात आले नसून त्यांचे निष्कासन करण्याची कार्यवाही प्राधिकरणामार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जेलरोड, राहुलनगर, पारा ॲव्हेन्यु सोसायटीमध्ये उद्‌वाहन कोसळून झालेला अपघात

**(२४) * ३९२१६ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जेलरोड, राहुलनगर, पारा ॲव्हेन्यु सोसायटीमध्ये तिसऱ्या मजल्यावरुन उद्‌वाहन कोसळून महिलेसह तीन चिमुकल्यांचा अपघात झाल्याची घटना घडली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात एकुण ११,५०० उद्‌वाहने असून त्यापैकी फक्त ४,५०० उद्‌वाहनांची मनपाकडून चौकशी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीच्या विकासकास नाशिक महापालिकेने उद्‌वाहन बसविण्याचा परवाना दिला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बांधकाम व्यावसायिकामार्फत सदर सोसायटीतील उद्‌वाहनाची वार्षिक देखभाल केली जात नसल्याने सदरचा अपघात घडलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात उद्‌वाहन असले तरी उद्‌वाहन निरीक्षणे आणि चौकशी करण्याची कार्यवाही विद्युत निरीक्षणालयाकडून करण्यात येत असते. उद्‌वाहनांचे वार्षिक निरीक्षण करण्यासाठी जास्तीचे अधिकाधिक मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने दि.२८.०४.२०२५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे उद्‌वाहनविषयक कामकाजाचे विभाग/ जिल्हास्तरावर विकेंद्रीकरण करण्यात आले आहे.

विद्युत निरीक्षक, नाशिक या कार्यालयात कार्यरत असलेल्या २ सहाय्यक विद्युत निरीक्षक व कार्यरत १० सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता यांच्यामार्फत माहे जून-२०२५ ते मे-२०२६ दरम्यान ४८२५ एवढ्या उद्वाहनांची नियतकालिक वार्षिक निरीक्षणे करण्यात आली असून, उर्वरित उद्‌वाहनांचे प्रलंबित वार्षिक निरीक्षणे करण्याचे काम नियमितपणे सुरु आहेत.

(३) नाशिक महानगरपालिकेमार्फत दि.१४.१२.२०२१ अन्वये बांधकाम परवानगी आणि प्रारंभ प्रमाणपत्र (Sanction of Building Permission and Commencement Certificate) विकासक श्री.किशोर चंद्रकांत पोकर, मे.पारा कंन्स्ट्रक्शन यांच्या नावाने दिलेले आहे. त्यानुषंगाने पारा ॲव्हेन्यु सोसायटीमध्ये उद्‌वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांनी प्रमाणपत्र क्र.मुविनि/५१६/ २१०४२०२५/११८२१७, दि.२१.०४.२०२५ अन्वये देण्यात आली आहे.

(४) विकासक श्री.किशोर चंद्रकांत पोकर, मे.पारा कंन्स्ट्रक्शन यांनी मे.स्टॅन्डर्ड एलीव्हेटर्स, नाशिक यांच्याकडून सदर सोसायटीच्या इमारतीमधील उद्‌वाहनाची उभारणी केली होती. तसेच मे.स्टॅन्डर्ड एलीव्हेटर्स, नाशिक यांच्याकडूनच सदर इमारतीमधील उद्‌वाहनाची देखभाल व दुरुस्ती करण्यात येत होती.

सदर प्रकरणी केलेल्या चौकशीदरम्यान महत्वाच्या सुरक्षा संयंत्र बायपास करून सदर उद्‌वाहन धोकादायक स्थितीत असल्याचे व या उद्‌वाहनाची नियमित देखभाल व दुरुस्ती अत्यंत बेजबाबदारपणे हाताळली गेली असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळेच सदरचा दुर्दैवी अपघात झाल्याची घटना घडली आहे.

सदर अपघातास विकासक श्री.किशोर चंद्रकांत पोकर, मे.पारा कंन्स्ट्रक्शन व मे.स्टॅन्डर्ड एलीव्हेटर्स, नाशिक हे दोघेही सामुहिकरित्या जबाबदार असल्याचे निष्पन्न होत आहे. त्याअनुषंगाने, विद्युत निरीक्षक, नाशिक यांनी दि.०२.०६.२०२६ रोजीच्या पत्रांन्वये कळविल्यानुसार, नाशिक रोड, पोलिस स्टेशन, नाशिक येथे गु.र.नं. २७६/२०२६, दि.२१.०४.२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता कलम ११०, १२५(ब), २८९(५) अन्वये स्टे.डा.नं.१२/२०२६ गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच, सदर अपघाताच्या अनुषंगाने जबाबदार असलेले विकासक श्री.किशोर चंद्रकांत पोकर,

मे.पारा कंन्स्ट्रक्शन व मे.स्टॅन्डर्ड एलीव्हेटर्स, नाशिक यांना दि.१८.०५.२०२६ रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(५) सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून याप्रकरणी दोषी आढळून आल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.